शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील विद्यार्थिनींसाठी वसतिगृहाकरिता इमारत भाडेतत्त्वावर घेण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः इभाडे-०७२६/प्र.क्र.२६६/ई-१७७९१४९/प्रशा-२
गो.ते. रुग्णालय परिसर, नवीन संकुल, लोकमान्य टिळक रोड,
मुंबई - ४००००१
तारीख: १३ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :-</u>

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी-२०१६/प्र.क्र.१८५ १६/शिक्षण-१,दि. ११.०५.२०१७
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक १७.०४.२०१५
३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन आदेश क्र. अप्रक-२०२४/प्र.क्र.३२/२४/आस्था, दिनांक १५ एप्रिल, २०२४
४) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र :DMER-१२०१९/८०/२०२६-EDU, दि. ०१.०७.२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

जळगाव येथे एकात्मिक वैद्यकीय शैक्षणिक संकुल निर्माण करण्यास दि.११ मे २०१७ रोजीच्या संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर संकुलामध्ये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, ५० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय दंत महाविद्यालय, ५० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय होमियोपॅथी महाविद्यालय व ४० विद्यार्थी क्षमतेचे भौतिकोपचार महाविद्यालय शुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदर एकात्मिक संकुलामधील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन उक्त महाविद्यालयास सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थिनींच्या निवासाकरिता खाजगी इमारत वसतिगृहासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराने भाडेतत्त्वावर घेण्याकरीता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.

भारतीय दंत परिषदेच्या मानकांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने वापरासाठी तयार असलेली खाजगी इमारत शासकीय दंत महाविद्यालय येथे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निवासाकरीता शासकीय दराने भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थिनींच्या वसतिगृहाची व्यवस्था तातडीने करण्याच्या दृष्टीने खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खाजगी इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या प्रति माह रु. १,१०,४०२/- (जी.एस.टी. सह) (स्थानिक कर वगळून) या दराने भाडेतत्वावर घेण्यास व त्याकरीता येणाऱ्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

इमारत मालकाचे नाव व पत्ता	इमारतीचा वापर	क्षेत्रफळ (चौ.मी.)	सा.बां.वि. निश्चित प्रतिमाह भाडे (रु.)	जी.एस.टी. @१८% (रु.)	एकूण प्रतिमाह भाडे (रु.)	कमाल वार्षिक खर्च (जी.एस.टी. सह) (स्थानिक कर वगळून) (रु.)
श्री. वर्धमान पन्नालाल भंडारी, वर्धमान रेसीडेन्सी, जळगांव (सर्व्हे नं.२८०/१, प्लॉट नं.२१, सीटी सर्व्हे नं.८४००, गजानन कॉलनी, जळगांव)	विद्यार्थिनी वसतिगृह	४०८.१४	९३,५६१	१६,८४१	१,१०,४०२	१३,२४,८२४

२. याबाबतचा भाडेकरार अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय, जळगाव यांनी संस्थास्तरावर करावा.

३. सदर भाडेकरार इमारत उपलब्ध करून दिल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल व त्याची मुदत तीन वर्षे किंवा शासकीय इमारत उपलब्ध होई पर्यंत राहील ,यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. काही कारणास्तव मुदतवाढ आवश्यक असल्यास शासन मान्यतेने करता येईल.

४. सदर इमारतीचे प्रतिमाह भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे मूल्यांकन अहवालानुसार वेळोवेळी सुधारित करण्यात येईल, त्यानुसार देय राहील.

५. प्रति माह भाडे व जी.एस.टी वर येणारा खर्च शासकीय दंत महाविद्यालय, जळगाव या संस्थेच्या (२२१० G३५१) लेखाशिर्षाखाली (१४) भाडेपट्टी व कर या उद्दिष्टाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दिनांक ११.०८.२०२६ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -१, अनुक्रमांक-१० अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१८१३००८४५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.08.13 18:27:33 +05'30'

(म.गि.जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र,मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय दंत महाविद्यालय, जळगाव.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.
६. श्री. वर्धमान पन्नालाल भंडारी, जळगाव.
७. निवडनस्ती (प्रशा-२).